# टी.  वाय. बी. ए.- तत्त्वज्ञान (२०१३ Pattern)

जी ३ : सौंदर्यशास्त्र आणि धर्माचे तत्त्वज्ञान

## बहुपर्यायी (वस्तुनिष्ठ) सराव प्रश्नसंच

## प्रकरण - १

१. खालीलपैकी तत्त्वज्ञानाची शाखा कोणती आहे?

अ) सौंदर्यशास्त्र

ब) नीतिशास्त्र

क) तर्कशास्त्र

ड) **वरील सर्व**

२. सौंदर्यशास्त्राला इंग्रजीमध्ये काय म्हणतात?

अ) Beautiful

ब) **Aesthetics**

क) Fairness

ड) Loveliness

३. 'मनुष्याच्या सौंदर्यविषयक अनुभूतीच्या पध्दतशीर अभ्यासाला ....... असे म्हणतात.

अ) निसर्गशास्त्र

ब) नीतिशास्त्र

क) **सौंदर्यशास्त्र**

ड) समाजशास्त्र

४. सौंदर्यशास्त्रावरील “Aesthetica” हा ग्रंथ कोणी लिहीला?

**अ) ए. जी. ब्राऊम गार्टन**

ब)ॲरिस्टॉटल

क) कांट

ड) कॉलींगवूड

५. खालीलपैकी कोणते सौंदर्याचा समावेश निसर्ग सौंदर्यामध्ये करता येईल.

अ) ताजमहाल

ब) चीनची भिंत

क) **उगवता सूर्य**

ड) शिवाजी महाराजांचा पुतळा

६. मानवनिर्मित भव्यतेचे (विराटतेचे) उदाहरण सांगा.

अ) रात्रीचे तारांकित आकाश

ब) **ताजमहाल**

क) पाण्याचा धबधबा

ड) सह्याद्रीच्या रांगा

७. सौंदर्य ... आहे तर आनंद .... आहे.

अ) पान, फूल

ब) फळ, फूल

क) **फूल, फळ**

ड) पान, फळ

८. ....विचारवंताच्या मते एखाद्या वस्तूच्या म्हणजे ती वस्तू अ‍ॅग्रीएबल आहे, शिव आहे की सुंदर आहे असा निर्णय देता येतो.

अ) प्लेटो

ब) कॉलिंगवूड

क) **कांट**

ड) बुलाख

९. वस्तूचे सौंदर्य आणि व्यक्तीची रसिकता या दोन्हींचा गुणाकार म्हणजे ......होय.

अ) सौंदर्यदृष्टी

ब) **सौंदर्यानुभूती**

क) सौंदर्यवृत्ती

ड) कलाकृती

१०. कला प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी कोणता घटक म्हत्त्वाचा आहे?

अ) निर्माता

ब) कलाकृती

क) आस्वादक

ड) **वरील सर्व**

११. कांटच्या मते सौंदर्यानुभव ..... आहे, तर आनंद ..... आहे.

अ)साधन, साध्य

ब) **साध्य, साधन**

क) भावनिकता, अनुभव

ड) दृष्टी, साध्य

१२. सौंदर्यानुभवाची अंतिम परीणती आनंद प्राप्त करण्यामध्येच आहे, असे कोणत्या भारतीय विचारवंताने म्हटले?

अ) **योगी अरविंद**

ब) स्वामी विवेकानंद

क) रवींद्रनाथ टागोर

ड) डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन

१३. सुंदर व उदात्त या दोन भिन्न गोष्टी आहेत असे सर्वप्रथम कोणी सांगितले?

अ) **बर्क**

ब) कांट

क) क्रोचे

ड) कॉलिंगवुड

१४. खालीलपैकी विसंगत घटक ओळखा.

अ) ताजमहाल

ब) इंडिया गेट

क) **पाण्याचा धबधबा**

ड) अजिंठा-वेरूळ लेणी

१५. सुळावर बळी जाणाऱ्या येशूच्या ठिकाणी कोणत्या प्रकारची भव्यता दिसून येते.

अ) मानवनिर्मित भव्यता

ब) निसर्गनिर्मित भव्यता

क) **अंतरंगाची भव्यता**

ड) यापैकी नाही

## प्रकरण — २

१. शब्द, स्पर्श, रुप, रस ही कलेची .... आहेत.

अ) साधने

ब) **माध्यमे**

क) विषय

ड) साध्य

२. कलावस्तू निर्मिती प्रक्रियेसाठी पुढीलपैकी कोणता घटक महत्त्वपूर्ण ठरतो?

अ) कलावंत

ब) माध्यम

क) कलावस्तू

ड) **वरील सर्व**

३. कलेचे एकूण किती प्रकारात वर्गीकरण करता येते?

अ) सहा

ब) तीन

क) चार

ड) **पाच**

४. नृत्य किंवा नाटक सादर करणे हा कलेचा कोणता प्रकार आहे.

अ) **कृतीप्रधान कला**

ब) श्राव्य कला

क) ललित कला

ड) उपयुक्त  कला

५. चित्रकला, कविता, कथा व कांदबरी या सर्वांचा कोणत्या कलेमध्ये समावेश होतो.

अ) दृश्य कला

ब) **ललित कला**

क) कृतीप्रधान कला

ड) उपयुक्त कला

६. "The Principle of Arts" हा कलेवरील ग्रंथ कोणी लिहीला?

अ) टॉलस्टॉय

ब) **कॉलिंगवूड**

क) प्लेटो

ड) डुकॅसी

७. 'Arts and Man' हा ग्रंथ कोणी लिहीला.

अ) शाकुंतल

ब) **बा. सी. मर्ढेकर**

क) भरतमूनी

ड) कालीदास

८. द्रव्य व आकार या  संकल्पना कोणत्या पाश्चात्य विचारवंताने मांडल्या आहेत?

अ) सॉक्रेटिस

ब) प्लेटो

क) **ॲरिस्टॉटल**

ड) कांट

९. ... हे कलाकृतीचे अविभाज्य घटक आहेत.

अ) **आकार व आशय**

ब) द्र्व्य व आकार

क) आशय व द्रव्य

ड) साधन व माध्यम

१०. पुढीलपैकी कोणत्या वस्तूंचा मानवनिर्मित सौंदर्यवस्तूमध्ये समावेश करता येणार नाही.

अ) सुंदर कविता

ब) कर्ण मधूर गाणी

क) ताजमहाल

ड) **फुलांचा गुच्छ**

**प्रकरण - ३**

१. मूळ गोष्टींच्या मागून जी कृती केली जाते त्याला ..... म्हणतात.

अ) **अनुकृती**

ब) अविष्कार

क) संवाद

ड) अर्थपूर्ण आकार

२. 'कला म्हणजे अनुकृती' असे कोणी म्हटले.

अ) ॲरिस्टॉटल

ब) प्लेटो

क) **अ व ब दोन्हीही**

ड) कांट

३. ॲरिस्टॉटलने कलाकृतीच्या संदर्भात खालीलपैकी कोणता सिध्दांत सांगितलेला आहे?

अ)अनुकृतीनिष्ठ सिध्दांत

ब) परिणामनिष्ठ सिध्दांत

क) अभिव्यक्तीनिष्ठ सिध्दांत

ड) **वरील सर्व**

४. सर्व वस्तूचे आदर्श रूप म्हणजे ‘आयडिया’ होय, असे कोणी म्हटले?

अ) सॉक्रेटिस

ब) **प्लेटो**

क) ॲरिस्टॉटल

ड) लॉक

५. 'कला म्हणजे अविष्कार' असे कोणत्या विचारवंताने म्हटले आहे.

अ)ॲरिस्टॉटल

ब) प्लेटो

क) **क्रोचे**

ड) ह्युम

६. कला ही अगोदरच कलावंताच्या मनात असते, ते कलेचे ..... स्वरूप होय आणि प्रत्यक्ष कला हे.....स्वरूप होय.

अ) बाह्य, आंतरिक

ब) अपूर्ण, पूर्ण

क) पूर्ण, बाह्य

ड) **अंतरिक, बाह्य**

७. 'कला म्हणजे संवाद किंवा संप्रेषण ' हा कलेचा अर्थ कोणी सांगितला?

अ) **टॉलस्टॉय**

ब) प्लेटो

क) ॲरिस्टॉटल

ड) क्रोचे

८. "What is Art" हा ग्रंथ कोणी लिहीला?

**अ) टॉलस्टॉय**

ब) क्रोचे

क) रॉजर फ्राय

ड)क्लाईव्ह बेल

९. विविध कलेद्वारे कलावंत आपले विचार व भावना आपल्यापर्यंत पोहचवतो यालाच ..... असे म्हणतात.

अ) अनुकृती

ब) अविष्कार

क) **संप्रेषण**

ड) अर्थपूर्ण आकार

१०. 'कला म्हणजे अर्थपूर्ण आकार' असा सिध्दांत कोणी मांडला?

अ) क्लाईव्ह बेल

ब) रॉजर फ्राय

क) **अ व ब दोन्हीही**

ड) टॉलस्टॉय

११. सौंदर्यशास्त्रात 'रुपवादी' किंवा 'आकारवादी' उपपतीचा पुरस्कार कोणी केला?

अ) **क्लाईव्ह बेल**

ब) क्रोचे

क) ॲरिस्टॉतल

ड) टॉलस्टॉय

## **प्रकरण -४**

१. मनुष्याच्या अंतकरणात कायम टिकून राहणारे जे भाव आहेत त्यांना ...... असे म्हणतात.

अ) स्वभाव

ब) **स्थायी भाव**

क) अनुभाव

ड) विभाव

२. एकूण रस किती प्रकारचे आहेत?

अ) आठ

ब) **नऊ**

क) सात

ड) अकरा

३. खालीलपैकी कोणता एक रस नाही.

अ) श्रृंगार

ब) हास्य

क) रौद्र

ड) **कृपाळू**

४. स्त्री-पुरुषांना एकमेकांबद्दल वाटणाऱ्या प्रेमातून व आकर्षनातून कोणत्या रसाची उत्पत्ती होते?

अ) **श्रृंगार**

ब) करुण

क) हास्य

ड) शांत

५. कोणता रस सर्व रसाचा राजा आहे.

अ) **श्रृंगार**

ब) हास्य

क) वीर

ड) शांत

६. भक्ती ही भावना प्रामुख्याने कोणत्या रसात आढळून येते?

अ) **शांत**

ब) करुण

क) अद्भूत

ड) रौद्र

७.किळस, विट, तिटकारा या भावना कोणत्या रसातून दिसून येतात?

अ) भयानक

ब) रौद्र

क) **बिभत्स**

ड) अद्भूत

८. अतिशय क्रोध, राग, द्वेश या भावनेतून कोणता रस निर्माण होतो?

अ)भयानक

ब) **रौद्र**

क) वीर

ड) करुण

९. 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) **भरतमूनी**

ब) शांकुतल

क) कालीदास

ड) ग. दि. माडगूळकर

१०. "विभावानुभावव्यभिचारी संयोगाद्रसनिष्पति:!" हा रससिध्दांत कोणी मांडला?

अ) अभिनव गुप्त

ब) कालीदास

क) **भरतमूनी**

ड) शांकुतल

११. एकूण किती प्रकारचे भाव आहेत?

अ) तीन

ब) चार

क) **पाच**

ड) सहा

१२. जे भाव स्थिर स्वरूपाचे नसतात, त्यांना......म्हणतात.

अ) विभाव

ब)अनुभाव

क)स्थायी भाव

ड) **व्यभिचारी भाव**

१३. स्वेद, रोमांच, स्वर भेद, आश्रू, प्रलय हे कोणत्या प्रकारचे भाव आहेत?

अ) स्थायी भाव

ब) विभाव

क) अनुभाव

ड) **सात्त्विक भाव**

**प्रकरण -५**

१. विविध धार्मिक संकल्पनेचा चिकित्सक अभ्यास तत्त्वज्ञानाच्या कोणत्या शाखेत केला जातो?

अ) नीतिशास्त्र

ब) ज्ञानशास्त्र

क) **धर्माचे तत्त्वज्ञान**

ड) सौंदर्यशास्त्र

२. Religion हा शब्द लॅटिन भाषेतील कोणत्या शब्दापासून तयार झालेला आहे?

अ) **Religare**

ब) Religious

क) Religio

ड) Religieuse

३. मानवाचे रानटी जीवन संपून, विशाल समाजाची निर्मिती कोणत्या धर्मात झाली?

अ) टोळी धर्म

ब) **राष्ट्र धर्म**

क) विश्व धर्म

ड) यापैकी नाही

४. मानवी जीवनाचे मुख्य ध्येय 'मोक्ष' हे कोणत्या धर्मात स्वीकारले गेले?

अ) टोळी धर्म

ब) राष्ट्र धर्म

क) **विश्व धर्म**

ड) अ व ब

५. 'धर्माशिवाय विज्ञान पंगू आहे व विज्ञानाशिवाय धर्म आंधळा आहे.' असे कोणत्या विचारवंताने म्हटले?

अ) कोपरनिकस

ब) **अल्बर्ट आईन्स्टाईन**

क) गॅलीलिओ

ड) ब्रूनो

६. धर्म व नीति यात प्रामुख्याने कोणत्या गोष्टींची मिमांसा केली जाते ?

अ) **मानवी वर्तनाची**

ब) मानवी मनाची

क) मानवी शरीराची

ड) यापैकी नाही

७. धर्म व धर्मग्रंथाची योग्य जोडी ओळखा.

अ) **हिंदू -भगवदगिता**

ब) मुस्लीम - बायबल

क) ख्रिश्चन - कुराण

ड) शीख - वेद

## प्रकरण -६

१. दुरीत याचा अर्थ काय?

अ) **दु:ख**

ब) सुख

क) प्रेम

ड) करुणा

२. साधारणत: दुरितांचे किती प्रकार आढळतात?

अ) पाच

ब) चार

क) तीन

ड) **दोन**

३. खालीलपैकी नैसर्गिक दूरित कोणते?

अ) अस्पृश्यता

ब) **महापूर**

क) भ्रष्टाचार

ड) यापैकी नाही

४. 'दु:खाचा उगम निसर्ग आहे' असे कोणी म्हटले?

अ) **जॉन स्टुअर्ट मील**

ब) सेंट ऑगस्टीन

क) सॉक्रेटिस

ड) व्हाईट हेड

५. भारतीय तत्त्वज्ञानात आधिभौतिक दु:ख, आध्यात्मिक दु:ख व आधिदैविक दु:ख असे दुरितांचे वर्गीकरण कोणी केले?

अ) न्याय

ब) वैशेषिक

क) **सांख्य**

ड) योग

६. खालीलपैकी मानवनिर्मित (नैतिक) दुरित कोणते?

अ) भ्रष्टाचार

ब) युध्द

क) दहशतवाद

ड) **वरील सर्व**

७. दु:ख हे आर्यसत्य कोणी सांगितले?

अ) चार्वाक

ब) महावीर

क) **गौतम बुध्द**

ड) पंतजली

८. माया व अविद्या या संकल्पना कोणी मांडल्या?

अ) चार्वाक

ब) **शंकराचार्य**

क) गौतम बुध्द

ड) स्वामी विवेकानंद

९. दुरिताचा उगम अज्ञान आहे, असे कोणी म्हटले?

अ) हेगेल

ब) सेंट ऑगस्टीन

क) **सॉक्रेटिस**

ड) रसेल

१०. कोणत्या तत्त्ववेत्याच्या मते दुरित हे अवास्तव व अभावरूप आहे, त्याचे स्वतंत्र अस्तित्व नाही.

अ) **सेंट ऑगस्टिन**

ब) सेंट थॉम्स ॲक्वायनस

क) हेगेल

ड) स्पिनोजा

११. खालीलपैकी कोणत्या भारतीय दर्शनाने ईश्वराच्या अस्तित्वाचा स्वीकार केलेला नाही?

अ) न्याय दर्शन

ब) वेदांत दर्शन

क) योग दर्शन

ड) **बौध्द दर्शन**

१२. ईश्वर संकल्पनेवरून ईश्वराचे अस्तित्व सिध्द करण्याचा प्रयत्न कोणत्या युक्तिवादात केलेला आहे.

अ) **सत्ताशास्त्रीय युक्तीवाद**

ब) विश्वकारण युक्तीवाद

क) प्रयोजनमूलक युक्तीवाद

ड) नैतिक युक्तीवाद

१३. या विश्वाला गती देणारा 'अचल चालक' ईश्वर आहे, असे कोणी म्हटले?

अ) सेंट थॉमस

ब) लायब्नीज

क) **ॲरिस्टॉटल**

ड) कांट

**प्रकरण - ७**

१. विचारवंत व त्यांचे ग्रंथ खालीलपैकी बरोबर जोडी कोणती?

**अ) कार्ल मार्क्स — दास कॅपिटल, द फिलॉसॉफी ऑफ पॉवर्टी**

ब) सिग्मंड फ्राईड - द कम्युनिस्ट मॅनिफिस्टो

**क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - ॲन्हिलेशन ऑफ कास्ट, द अनटचेबल, 'द बुध्दा ॲन्ड हिज धम्मा'**

ड) कांट - दि फ्युचर ऑफ ॲन इल्युजन

२. 'धर्म ही अफुची गोळी आहे' असे कोणत्या विचारवंताने म्हटले?

अ) सिग्मंड फ्राईड

ब) **कार्ल मार्क्स**

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ड) म. गांधी

३. वर्गविहीन व शोषनरहीत समाज स्थापन करण्याचे उद्दिष्ट कोणाचे होते?

अ) **कार्ल मार्क्स**

ब) सिग्मंड फ्राईड

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ड) यापैकी नाही

४. कार्ल मार्क्स हा भौतिकवादी तत्त्वज्ञ असून त्याच्या तत्त्वज्ञानाला ..... असे म्हणतात.

अ) अज्ञेयवाद

ब) फलत: प्रामाण्यवाद

क) तार्किक प्रत्यक्षवाद

ड) **द्वंद्वविकासात्मक भौतिकवाद**

५. 'धर्म हाच एक भ्रम आहे' असे कोणी म्हटले?

अ) कार्ल मार्क्स

ब) **सिग्मंड फ्राईड**

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ड) डॉ.  राधाकृष्णन

६. मनोविश्लेषण पध्दतीचा जनक असे कोणाला म्हटले जाते?

अ) **सिग्मंड फ्राईड**

ब) कार्ल मार्क्स

क) ईमाईल डरखाइम

ड) एरिक फ्रॉम

७. 'अबोध मनाची' संकल्पना कोणी मांडली?

अ) एरिक फ्रॉम

ब) **सिग्मंड फ्राईड**

क) कार्ल युंग

ड) सी. डॉसन

८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मसंकल्पना कशावर आधारित आहे?

अ) धर्मावर

ब) अंध: श्रध्देवर

क) **नीतिवर**

ड) जातीव्यवस्थेवर

९. 'धम्म म्हणजे नीति आणि नीति म्हणजे धम्म' असे कोणी म्हटले?

अ) **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

ब) स्वामी विवेकानंद

क) डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन

ड) महात्मा गांधी

१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर करण्यामागे प्रमुख कारण कोणते?

अ) हिंदू धर्म वर्ग, जातीव्यवस्था, उच्चनीचता यांचे समर्थन करतो.

ब) हिंदू धर्मात अस्पृश्यांना चांगली वागणूक मिळत नसे.

क) हिंदू धर्मात स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वाचे पालन केले जात नसे.

**ड) सर्व बरोबर**

११. डॉ. बाबासाहेबांनी बौध्द धर्माचा स्वीकार केव्हा व कोठे केला?

अ) १३ आक्टो. १९३५, येवला (नाशिक)

ब) **१४ आक्टो. १९५६, नागपूर**

क) २० नोव्हे. १९५६, नेपाळ

ड) १८ सप्टे. १९३६, अमृतसर

१२. 'द बुध्दा ॲन्ड हिज धम्मा' हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) गौतम बुध्द

ब) कार्ल मार्क्स

क) **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

ड) म. फुले

## प्रकरण — ८

१. भारतीय राज्यघटनेच्या कितव्या कलमामध्ये धर्मनिरपेक्षतेचा अर्थ स्पष्ट केलेला आहे?

**अ) २५ व्या**

ब) २७ व्या

क) २८ व्या

ड) ३२ व्या

२. धर्मनिरपेक्षता म्हणजे काय?

अ) भारतातील कोणत्याही व्यक्तीला त्याला योग्य वाटणाऱ्या उपासनेचा, धर्मपालनाचा पूर्ण अधिकार आहे.

ब) कोणत्याही धर्माच्या बाबतीत सरकार हस्तक्षेप करणार नाही.

क) व्यक्तीव्यक्तीमध्ये धर्माच्या नावावर भेदभाव केला जाणार नाही.

ड) **वरील सर्व**

३. भारताने कोणती शासनप्रणाली स्वीकारली आहे.

अ) धर्मनिरपेक्ष

ब) लोकशाही

क) **अ व ब दोन्ही**

ड) अध्यक्षीय

४. ....... यांनी सर्वप्रथम सर्वधर्मसमभाव या तत्त्वाचा पुरस्कार केला.

अ) **महात्मा गांधी**

ब) विनोबा भावे

क) डॉ. आंबेडकर

ड) लो. टिळक

५. भारतीय राज्यघटनेतील भाग तीन मधील कोणत्या कलमान्वये धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे?

अ) कलम १४-१८

ब) कलम १९-२२

क) कलम २३-२४

ड) **कलम २५-२८**

६. मूलतत्त्ववाद म्हणजे काय?

अ) एक प्रकारची नियमावली

ब) **विशिष्ट धर्मातील मूळ तत्त्वांची विचारसरणी**

क) सर्व धर्माना समान लेखने

ड) लोकांना धर्मांधतेपासून मूक्त करणे

७. खालीलपैकी मूलतत्त्ववादावरील उपाय कोणता?

अ) धर्मनिरपेक्षता

ब) सर्वधर्मसमभाव

क) स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा स्वीकार

ड) **वरील सर्व**

८. भय दाखवून किंवा त्रास देऊन आपले ध्येय गाठण्याचा सिध्दांत म्हणजे ...... होय.

अ) **दहशतवाद**

ब) मूलतत्त्ववाद

क) समाजवाद

ड) मानवतावाद

९. 'जर शासक अत्याचारी असेल तर त्याचा वध करणे उचित होय.' असे कोणत्या तत्त्ववेत्याने म्हटले?

अ) प्लेटो

ब) ॲरिस्टॉटल

क) सॉक्रेटिस

ड) **अ व ब दोन्हीही**

१०. ११ सप्टे. २००१ रोजी अमेरिकेवर झालेला दहशतवादी हल्ला हा कोणत्या प्रकारचा दहशतवाद आहे.

अ) राज्यपुरस्कृत दहशतवाद

ब) **आंतरराष्ट्रीय दहशतवाद**

क) राष्ट्रीय दहशतवाद

ड) स्थानिक पातळीवरील दहशतवाद

११. दहशतवादावरील सैनिकी उपायामध्ये खालीलपैकी कशाचा समावेश करता येणार नाही.

अ) प्रतिबंधात्मक उपाय

ब) सुटकेचा उपाय

क) प्रतिक्रियात्मक उपाय

ड) **कायदेविषयक उपाय**

✪ ✪ ✪